**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट दिनांक – ०८/०४/२०२४

**दि. ०७/०४/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ४४४/२०२४ भा.दं.वि कलम ३०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०५/०४/२०२४ रोजी ०९/३० वा. चे सुमारास त्रिशक्ती कॉलनी तापकीरनगर काळेवाडी पुणे येथे राहत्या घरामध्ये. |
| गुन्हा दाखल | :- | दि.०७/०४/२०२४ रोजी ०४.३६ वा |
| फिर्यादी | :- | ललीता दौलतराम वाघ वय-५० वर्ष, काम घरकाम,रा.त्रिशक्ती कॉलनी, तापकीर नगर, काळेवाडी, पुणे |
| आरोपी | :- | संदिप भिकचंद बागमार वय ४५ वषे्रा.दगडु पाटील नगर, थेरगाव पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीचे पती श्री.दौलतराम भानुदास वाघ यांनी त्यांचा गेले ६ ते ७ वर्षा पासुनचा मित्र नमुद आरोपी यास त्याचे व्यवसाया करीता अनेक लोकांकडुन उसने व व्याजाने पैसे घेवुन दिले होते. परंतु नमुद आरोपीने त्याला दिलेले पैसे लोकांना परत दिले नसल्याने सदरचे लोक हे पैशा करीता फिर्यादीचे पतीकडे तगादा लावत असल्याने फिर्यादीचे पती व आरोपी यांच्यात पैशावरुन भांडण होत होते. तसेच आरोपीयाने पैसे परत करण्यास नकार देवुन फिर्यादीचेपती यांचे सोबत भांडण करुन त्यांना मानसिक व आर्थिक त्रास दिल्याने त्यास कंटाळुन फिर्यादीचे पती दौलतराम वाघ यांनी घरामध्ये दोरीने गळफास घेवुन अत्महत्या केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि सुर्यवंशी ७२७६६४५९८७ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी १७३/२०२४भा.दं.वि कलम३२६,३२३,५०४,५०६,४२७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६/०४/२०२४ रोजी १७/४५ वा.चे सुमारास आकुर्डी येथील मल्हारराव कुटे हॉस्पीटल समोरील रिक्षा स्टॅन्डवर येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०७/०४/२०२४ रोजी ०३.४९ वा |
| फिर्यादी | :- | सागर बाळकृष्ण पांढरकर वय ३८ वर्षे,व्यवसाय रिक्षा चालक,रा.नारायण कॉम्प्लेक्स जवळ पांढरकरवस्ती,पंचतारा नगर,आकुर्डी |
| आरोपी | :- | विरेंद्र ऊर्फ बेंदया भोलेनाथ सोनी रा.दळवीनगर,चिंचवड.<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी याने फिर्यादी याचेकडे येवुन माझे घरातील लोकांना माझे बद्दल खोट सांगतो काय,असे म्हणुन चिडुन जावुन फिर्यादी यांचे डोक्यात पाठीमागे दगडाने मारुन तसेच तोंडावर कपाळयाचे मध्यभागी व नाकावर कोयत्याने मारहाण करुन आपखुशीने गंभीर दुखापत केली व पुन्हा हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ,दमदाटी करुन फिर्यादी यांचे रिक्षाचे मर्गाडवर दगड टाकुन रिक्षाचे नुकसान करुन तेथुन पळुन गेला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि सातपुते ९३०९९७०८९६ |

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली २०३/२०२४ भा.दं.वि कलम ३२८,१२०(ब),३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२७.०३.२०२४ रोजी ०७.३० ते ०८.४० वा चे दरम्यान टाटा मोटर्सचे कार प्लॅटचे कॅन्टीनमध्ये,स्पाईनरोड,चिखली,पुणे

गुन्हा दाखल :- दि.०७/०४/२०२४ रोजी ००.५९ वा

फिर्यादी :- किर्तीकुमार शंकरराव देसाई,वय-३६ वर्ष व्यवसाय-नोकरी रा.फ्लॅट नंबर ७०३, सी विंग, पारितोष,पाटीलनगर,मिटकॉन कॉलेज रोड,बालेवाडी,पुणे-१९

आरोपी :- मेसर्स एसआरएस एंटरप्रायझेस मालक
१)रहीम शेख,
२)अझर शेख,
३)मझर शेख पत्ता गाडे कंपनी जवळ,मोरवाडी सेक्टर नंबर ३६/९,पिंपरी चिंचवड,पुणे
४)फिरोज शेख ऊर्फ मंटु
५)विकी शेख
**आरोपी क्र ४ अटक आहे**

तपशिल :- कॅटॅलीस्ट सर्व्हीस सोल्युशन्स पार्टनर्स प्रा.लि.औंध,पुणे या कंपनीमध्ये फिर्यादीहे सहा.महाव्यवस्थापक म्हणुन नोकरी करतात.टाटा मोटर्स,स्पाईन रोड,चिखली पुणे कंपनीसोबत कॅन्टीनमधील खादय पदार्थ पुरविण्याचा करार तक्रारदार यांचे कंपनीसोबत झालेला आहे.तक्रादार यांचे कंपनीने समोसा पुरविण्यासाठी मेसर्स एसआरएस एंटरप्रायझेस पत्ता गाडे कंपनीजवळ मोरवाडी सेक्टर नंबर ३६/९,पिंपरी चिंचवड,पुणे यांचे सोबत करार केलेला होता. मेसर्स एसआरएस एंटरप्रायझेस यांचेकडुन पुरविण्यात आलेल्या एका समोसामध्ये प्रथमोपचार पट्टी मिळुन आल्याने कंपनीने समोसे पुरविण्याचा करार रद्द केलेला होता.त्यानंतर तक्रारदार यांचे कंपनीने समोसा पुरविण्यासाठी मेसर्स मनोहर एंटरप्रायझेस पुणे यांचे सोबत करार केलेला आहे.मेसर्स एसआरएस एंटरप्रायझेस यांचेसोबत असलेला समोसा पुरवठा करण्याचा करार रद्द केल्यामुळे मेसर्स एसआरएस एंटरप्रायझेसचे मालक यांनी तक्रादार यांचे कंपनीची प्रतिष्ठा मलीन व्हावी,टाटा कंपनीमधील असलेला करार रद्द व्हावा याकरिता नमुद आरोपी क्र १ ते ३ यांनी त्यांचेकडील कामगार आरोपी क्र ४ व ५ यांचे सोबत कट कारस्थान रचुन दोन्ही कामगारांना तक्रारदार यांना समोसा पुरविणा-या मेसर्स मनोहर एंटरप्रायझेस येथील कारखान्यामध्ये रोजदारीवर कामाला पाठवुन आरोपी क्रमांक १ ते ३ यांचे सांगण्यावरुन आरोपी क्रमांक ४ व ५ यांनी समोसा खादय पदार्थामध्ये निरोध टाकुन किळसवाणा प्रकार केलेला आहे,दगड टाकुन तसेच विमल पान मसाला तंबाखुजन्य गुटखा सेवन केल्यामुळे तोंडाचा कर्करोग व इतर विकार होवुन शरिराची हानी होवु शकते हे माहित असताना देखील जाणीवपुर्वक समोसामध्ये विमल पान मसाला टाकला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि न्यामणे ९९२३४५५१११

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- देहुरोड २०१/२०२४ भा.दं.वि कलम ४५७,३८०

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०६/०४/२०२४ रोजी २२/३० ते दि.०७/०४/२०२४ रोजी चे पहाटे ०४/४० वाजणेचे दरम्यान श्री महाराजा मिठाईवाला नावेचे स्विट मार्ट ,परंडवाल चौक देहुगाव येथे

गुन्हा दाखल :- दि.०७/०४/२०२४ रोजी १९.१७ वा

फिर्यादी :- खेताराम भंराराम देवासी वय ३२ वर्ष धंदा व्यवसाय रा. त्रिमुर्ती बिल्डींग प्लॅट नं ३०३, परंडवाल चौक ,देहुगाव पुणे

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी दुकानाचे शटर लॉक लावुन बंद असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याणे कशाचे तरी सह्याने दुकानाचे शटर उचकटुन त्यावाटे फिर्यादीचे संमतीशिवाय अनाधिकाराने लबाडीच्या इराद्याने दुकाणात प्रवेश करुण दुकाणातील काउंटर मधिल एकुण ३,२०,०००/-रुपये रोख रक्कम चोरुण नेले आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि राठोड ९०२८३८५८४१

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ४४३/२०२४ भा.दं.वि कलम ३७०(३) ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंधअधिनियम १९५६ चे कलम ३,४,५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६/०४/२०२४ रोजी सायं १९/२० वा. सुमारास पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०७/०४/२०२४ रोजी ०३.२८ वा |
| फिर्यादी | :- | गणेश सिताराम कारोटे वय ३६ वर्षे पोना १७६८ नेमणुक- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष पिंपरी चिंचवड |
| आरोपी | :- | १)महिला आरोपी<br>**पाहिजे आरोपी**<br>२)रंजित सिंह ऊर्फ निल राजपुत वय ३० वर्षे रा. आधार कार्डवरील पत्ताः- बिल्डींग ए-६/३०३ स्वस्तिक पामस, ब्रम्हांड ७, ठाणे शहर (स्पा चालक मालक)<br>**आरोपी क्र १ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी संगणमत करुन स्पा सेंटरचे नावाखाली ०२ पिडीत महिला यांना पैशांचे अमिष दाखवून त्यांना स्पा मसाज सेंटरचे नावाखाली प्राप्त करून वेश्याव्यवसायासाठी प्रवृत्त करुन त्यांचेकडून वेश्याव्यवसाय करुन घेऊन त्यातून मिळालेल्या रकमेतून स्वतःची उपजिवीका भागवित असताना ३,०२०/- रु किं चे मुद्देमाला सह मिळुन आले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि सुर्यवंशी ७२७६६४५९८७ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी २३८/२०२४ भा.दं.वि कलम३२८,१८८,२६९,२७०,२७२,२७३ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६/०४/२०२४ रोजी २०/२५ वा. चे सुमारास मौजे भोसरी गावचे हददीत, संघर्ष कॉलनी मध्ये (घरमालक प्रल्हाद सुधारे) यांचे खोलीत, मोहन नगर, भोसरी येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०७/०४/२०२४ रोजी ०२.४५ वा |
| फिर्यादी | :- | प्रभाकर हनुमंत खाडे पोलीस शिपाई ब.नं २२१९ नेमणुक भोसरी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड |
| आरोपी | :- | अभिजीत उर्फ पप्पु गंगाराम भोर वय ४० वर्ष रा.लांडगे नगर स्वामी समर्थ कॉलनी नं ३, भोसरी पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी याने शासनाने प्रतिबंधित केलेले तंबाखुजन्य /गुटखा /सुंगधी सुपारी पदार्थाचे सेवनाने मुखाचे कर्करोग व इतर विकार होऊन शारिरीक हानी होऊ शकते हे माहित असताना देखील एकुण ४,५२,१५०/-रुपये किं.चा वेगवेगळया कंपनीचा शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा सुगंधीत तंबाखु व पान मसाला विक्री करीता बेकायदेशीर साठवणुक केलेल्या मालासह मिळुन आला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि जोनापल्ले ७५८८९१०२५७ |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी १७२/२०२४ भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४ (२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) सह १३५ ,१४२ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६/०४/२०२४ रोजी २२.३० वा जय श्री स्वामी समर्थ इंजिनिअरींग कंपनी समोर परशुराम चौक निगडी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०७/०४/२०२४ रोजी ००.५८ वा |
| फिर्यादी | :- | आतिष शामराव कुडके पोलीस नाईक बक्कल नंबर १९२३ नेमणुक गुन्हे शाखा युनिट-२, |
| आरोपी | :- | निहाल महमद शेख वय २५ वर्षे रा. दत्तमंदिराचे मागे मोहननगर चिंचवड पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांस मा. पोलीस उप-आयुक्त परिमंडळ १ पिंपरी चिंचवड यांचा तडीपार आदेश क्र. ६१/२०२३ दिनांक १७/११/२०२३ रोजीचे आदेशान्वये पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्द, पुणे शहर पोलीस आयुक्तालय हद्द व पुणे ग्रामीण पोलीस हद्दीतुन दोन वर्षाकरीता तडीपार केले असतांना त्याने महाराष्ट्र शासनाची अगर मा. पोलीस उप- आयुक्त परिमंडळ १ पिंपरी-चिंचवड यांची कोणतीही परवानगी न घेता तडीपार आदेशाचा व मा. |

| | | |
|---|---|---|
| | | पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांचा मनाई आदेशाचा भंग करून नमुद आरोपी हा एक धारदार लोखंडी कोयत्यासह मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोफौ बोरसे ९०११०९५३६३ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी १७४/२०२४ भा.दं.वि कलम ३०४(अ),२७९,सह मोटार वाहन कायदा कलम ११९/१७७, १८४,१३२(१) (क) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०७/०४/२०२४ रोजी ११/१५ वाचे सुमा.गोडाऊन चौका कडुन संतनगर चौका कडे जाणारे रोडवर, संतनगर मोशीता हवेली जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०७/०४/२०२४ रोजी १८.०९ वा |
| फिर्यादी | :- | दिपक लक्ष्मण कायते वय ४४ वर्ष धंदा कन्टीन रा.व्दारा-संदीप तेलकर, विनायकनगर, बो-हाडेवस्ती, मोशी पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात वाहना वरील चालक |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीचे वडील लक्ष्मण शंकर कायते वय ६८ वर्ष रा.विनायकनगर, बो-हाडेवस्ती, मोशी पुणे हे गोडाऊन चौकाकडुन संतनगर चौकाकउे पायी चालतजात असताना संतनगर चौका जवळ एका अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगईने, निष्काळजीपणे व वाहतुकीचे नियमाकडे दुर्लक्ष करुन चालवुन फिर्यादीचे वडीलाना जोराची धडक देऊन, अपघातकरुन पळुन जावुन, अपघातात त्याचे डोक्याला गंभीर दुखापत करुन त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मसपोफौ पाडवी ९८२२०२५१८९ |